Banker's Social Association Reg.No. Solapur/ 0000564/ 2018

परिशिष्ट क

# ''बँकर्स सोशल असोसिएशन''

<u>नियम आणि नियमावली</u>

**१. संस्थेचे नांव :**

संस्थेचे नांव **''बँकर्स सोशल असोसिएशन''** असे राहील. यापुढे या ज्ञापनात वेळोवेळी येणार संस्था या संक्षिप्त शब्दाचा अर्थ **''बँकर्स सोशल असोसिएशन''** असा लावला आहे.

**२. संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता :**

द्वारा : श्री. हारुण मलंग सय्यद
प्लॉट नं. १५, सिरत कॉलनी, परांडा रोड, बार्शी, जि. सोलापूर

**३. संस्थेचे कार्यक्षेत्र :**

या संस्थेचे कार्यक्षेत्र **संपुर्ण भारतभर** राहील.

**४. हिशोबाचे वर्ष :**

या हिशोबाचे वर्ष **१ एप्रिल ते ३१ मार्च अखेर** असे राहिल.

**५. सभासदस्यत्व व त्यांची नोंदणी पद्धत :**

संस्थेची ध्येय, धोरण तसेच नियमावली मान्य असलेल्या महाराष्ट्र व गोवा राज्यातील स्टेट बँकेतील सर्व कर्मचारी कोणत्याही १८ वर्षावरील नागरिकाला वार्षिक फि रु. १२०/- देऊन संस्थेचे सदस्यत्व प्राप्त करता येईल. त्याकरीता त्याला संस्थेकडे रितसर अर्ज करावा लागेल, आलेल्या अर्जाला कार्यकारी मंडळाने मंजुरी दिल्यावर सदस्यत्वाची निर्धारीत वर्गणी संस्थेत जमा केल्यानंतर त्याची नोंदणी सदस्य यादीमध्ये करण्यात येईल.

**६) सभासदाचे प्रकार :-**

**१) सर्वसाधारण सदस्य :-** संस्थेला रु. १२०/- वार्षिक वर्गणी देणाऱ्या बँकेतील सेवारत कर्मचारी सर्वसाधारण सदस्य समजण्यात येईल.

**७) सदस्य रद्द होणे :-**

कोणताही सदस्य कायदेशिर गुन्हेगार ठरला असेल, मृत्यु पावला असले, सदस्य वर्गणी दिली नसेल, देश सोडून परदेशात गेला असेल, संस्थेच्या हिताला नुकसान पोहचवित असेल, असे निदर्शनास आल्यास किंवा अन्य कारणावरुन कार्यकारी मंडळाने बहुमताने ठराव मंजुर करुन काढून टाकल्यास सदस्यत्व रद्द झाले असे समजले जाईल. तसेच राजीनामाद्वारे सदस्यत्व रद्द होईल.

**८) सर्वसाधारण सभा व तिचे कार्य :-**

अध्यक्ष सचिव खजिनदार

Chairman Secretary Treasurer
Banker's Social Association



Scanned by CamScanner

Banker's Social Association
Reg.No. Solapur/ 0000064/ 2018

सर्व साधारण सभा ही संस्थेची व शेवटचा निर्णय देणारी सभा म्हणून समजण्यात येईल. ही सभा वर्षातून एक वेळा तरी घेतली पाहिजे. या सभेत सर्व प्रकारचे सदस्य भाग घेऊ शकतील, कार्यकारी मंडळाने चालविलेल्या कार्यावर नियंत्रण ठेवणे, वार्षिक हिशोब मंजुर करणे, पुढील नवीन वर्षाचे अंदाजपत्रकाला मंजुरी देणे, आवश्यकतेनुसार नियमात बदल करणे, कार्यकारी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवड करणे, वेळेवर येणाऱ्या ठरावावर निर्णय देणे.

**९) सर्वसाधारण सभेची सूचना व गणसंख्या :-**

सर्वसाधारण सभेची सूचना संस्थेच्या सर्व सदस्यांना देणे आवश्यक राहिल. सूचनेमध्ये दिनांक, वेळ, स्थळ, सभेचे विषय नमूद करणे आवश्यक आहे. सूचना सर्व सदस्यांना संस्थेच्या डाकबुकावर सही घेवून देता येईल. अगर रजि. एडी टपालद्वारे पाठविता येईल. सूचना सभेच्या १५ दिवस अगोदर पाठविणे आवश्यक राहील. एकूण सदस्य संख्या त्या २/३ सदस्य उपस्थित झाल्यास सभा स्थगित झाल्यास सभेला कोरमचे बंधन राहणार नाही. परंतु अशी टीप सूचना असणे आवश्यक राहील.

**१०) विशेष सर्वसाधरण सभा व तिचे कार्य :-**

अशी सभा आवश्यकतेनुसार केव्हाही घेता येईल. जे कार्य सर्वसाधरण सभा करु शकते. ते करण्याचा अधिकार विशेष सर्वसाधरण सभेला असेल. सर्वसाधारण सभा झाल्यानंतर एकूण सभासद संख्येच्या ३/५ सदस्यांची अशा सभेची मागणी केल्यास किंवा संस्थेच्या हिताच्या दृष्टीने काही महत्वाच्या विषयावर निर्णय घ्यावयाचे असल्यास विशेष सर्वसाधरण सभा बोलविण्याचा अधिकार अध्यक्ष/सचिव यांना राहिल. अशा सभेची सूचना १५ दिवस अगोदर सर्व सदस्यांना देण्यात येईल. अशा सभेत एकूण संख्येच्या २/३ इतकी गणसंख्या असेल. गणसंख्ये अभवी तहकुब केलेली सभा पुन्हा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. अशा सभेत गणसंख्येची अट राहणार नाही. सदर सभेत घेतलेले निर्णय सर्व सदस्यांवर बंधनकारक राहतील.

**११) संस्थेचे कार्यकरी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची रचना :-**

संस्थेच्या कार्यकारी मंडळात कमीत कमी ७ जास्तीत जास्त २१ पदाधिकारी असू शकतात. त्यात एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष, एक सचिव, एक खजिनदार व १७ सदस्य असे राहतील. पहिले कार्यकारी मंडळ ११ जणांचे राहिल.

**१२) कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ व निवडणूकीची पद्धत :-**

कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ ५ वर्षाचा राहिल. निवडणूकीची पद्धत सर्व समंतीने/ हात वर करुन/गुप्त मतदान पद्धतीने सर्वसाधराण सभेत बहुमताने दर ५ वर्षाने निवडले जातील.

अध्यक्ष सचिव खजिनदार

Chairman Secretary Treasurer
Banker's Social Association



Scanned by CamScanner

Banker's Social Association Reg.No. Solapur/ 0000064/ 2018

१३) **कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी :-**

**अध्यक्ष :-** सभेचे अध्यक्ष स्थान स्विकारणे, कामकाज चालविणे व संस्थेच्या हितसंबंधीत योग्य ते आदेश देणे, संस्थेच्या कारभारावर व त्यांच्या शाखेवर नियंत्रण ठेवणे, नोटीस काढून सभा आयोजित करणे, रकमेची देवाण घेवाण करणे.

**उपाध्यक्ष :-** सभेमध्ये अध्यक्षांची उपस्थिती नसल्यास सभेचे कामकाज उपाध्यक्ष चालवितील. कामकाज चालविणे व संस्थेच्या हितसंबंधीत योग्य ते आदेश देणे, संस्थेच्या कारभारावर व त्यांच्या शाखेवर नियंत्रण ठेवणे, नोटीस काढून सभा आयोजित करणे, रकमेची देवाण घेवाण करणे.

**सचिव :-** संस्थेच्या सभा बोलविणे, संस्थेचा पत्रव्यवसहार करणे, तक्रारीचे निवारण करणे, संस्थेच्या कर्मचाऱ्यांवर लक्ष ठेवणे, किरकोळ नियम तयार करणे, संस्थेच्या दृष्टीने आवश्यक ते कोर्ट कचेरीची कामे करणे, हिशोबांची पत्रके तयार करणे व सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे, रोजचे हिशोब तपासून त्यावर सह्या करणे, खर्चाची बिले मंजूर करणे, संस्थेच्या वतीने रकमेची देवाण घेवाण करणे, संस्थेच्या मालमत्तेची देखरेख करणे, मंजुर झालेले ठराव अंमलात आणणे.

**खजिनदार :-** संस्थेच्या आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे, हिशोब लिहिणे, अगर लिहून घेणे, हिशोब पूर्ण झाल्यावर कार्यकारी मंडळापुढे ठेवणे, हिशोबाचे पुस्तकातून वार्षिक पत्रके तयार करणे, रकमेची देवाण घेवाण करणे, ऑडीटर यांनी हिशोबातून काढलेल्या त्रुटींची पुर्तता करणे.

**सल्लागार :** संस्थेच्या कामकाजाविषयी कायदेविषय सल्ला देणे.

**सदस्य :-** सर्वसाधारण सभेत उपस्थित राहणे, निवडणूकीच्या वेळी मतदान करणे, संस्थेच्या कामात आवश्यक ती मदत करणे.

१४) **कार्यकारी मंडळाची सभा व मागणीच्या सभा :-**

कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना ७ दिवस अगोदर देणे आवश्यक राहील. सूचनेमध्ये दिनांक, वेळ, सभेचे विषय नमूद करणे आवश्यक राहील. सूचना संस्थेच्या डाकबुकात सही घेऊन अथवा रजि. ए. डी. टपालाद्वारे पाठविता येईल. कार्यकारी मंडळाचे २/३ सदस्य उपस्थित झाल्यास गणसंख्या पूर्ण झाली असे समजले जाईल.

१५) **कार्यकारी मंडळाचे निवडणूकीचे नियम :-**

सर्वसाधारण सभा ठरविल्याप्रमाणे राहील. ज्या सदस्यांकडे संस्थेची कोणतीही रक्कम येणे बाकी आहे. अशा सदस्याला निवडणूकीला उमेदवार म्हणून उभे राहता येणार नाही. मतदान करण्याचा हक्क राहणार नाही.

अध्यक्ष    सचिव    खजिनदार

Chairman Secretary Treasurer
Banker's Social Association



Scanned by CamScanner

मंडळाची बहुमताने संमती घ्यावी लागेल. संस्थेची स्थावर व जंगम मालमत्ता विक्री करावयाची असल्यास ती विकण्यापूर्वी मा. धर्मादाय आयुक्तांची परवानगी घेणे आवश्यक राहिल.

Banker's Social Association Reg.No. Solapur/ 0000064/ 2018

२२) बँक खाते :-

संस्थेजवळ शिल्लक असलेली रक्कम ठेवण्यासाठी शेड्युल बँक किंवा राष्ट्रीयकृत बँकेत संस्थेच्या नावाने ठेवता येईल. अध्यक्ष, सचिव, खजिनदार या ३ पदाधिकाऱ्यांपैकी कोणत्याही दोन पदाधिकाऱ्यांच्या संयुक्त सहीने रक्कम काढता येईल.

२३) सभासदांची यादी ठेवण्याची पद्धत :-

१८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १५ अ प्रमाणे संस्थेचे सदस्य असतील त्यांची १ यादी १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र निमयमातील नियम १५ प्रमाणे अनुसूचीमध्ये नमुन्यात ठेवण्यात येईल.

१८६० चे संस्था नोंदणी अधिनियमाप्रमाणे कलम ४ प्रमाणे व १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियम ७ प्रमाणे दरवर्षी कार्यकारी मंडळाची यादी अनुसूची १ च्या नमुन्यात आपले विभागाचे सहाय्यक संस्था निबंधकाचे कार्यालयात पाठवावी लागेल.

१८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम ४ अ प्रमाणे १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियम ८ प्रमाणे दरवर्षी संस्थेत नोकरीत लावलेल्या व्यक्तींच्या नोकरीसंबंधी अटीबाबतचे विवरण अनुसूची दोन या नमुन्यात आपले विभागाचे सहाय्यक संस्था निबंधकाचे कार्यालयात पाठवावे लागेल.

२४) नियम व नियमावलीतील बदल करण्याची तरतूद :-

संस्थेच्या नियम व नियमावलीतील बदल करावयाचा असल्यास सर्वसाधारण सभेत उपस्थित सदस्यांच्या ३/५ बहुमताने ठराव मंजुर करुन नियमावलीतील.नोंदणी अधिनयमाचे कलम १२ अथवा १२ अ प्रमाणे कार्यवाही पूर्ण करावी लागेल.

२५) संस्थेच्या नावात व उद्देशात बदल करण्याची तरतुद :-

संस्थेच्या नावात अथवा उद्देशात बदल, वाढ, किंवा घट करावयाची असल्यास संस्था नोंदणी अधिनियमाचे कलम १२ अथवा १२ अ प्रमाणे कार्यवाही पूर्ण करावी लागेल.

२६) विसर्जन :-

संस्थेचे कार्य बंद करावयाचे असल्यास सदस्यांच्या बहुमताने सर्वसाधारण सभेत मंजुरी घ्यावी लागेल. संस्थेचे सर्व प्रकरणे देणे घेणे बाबतची व्यवहार पूर्ण करावी लागेल. तसेच संस्थेची

अध्यक्ष सचिव खजिनदार

Chairman Secretary Treasurer
Banker's Social Association



Scanned by CamScanner

शिल्लक मालमत्ता अन्य दुसऱ्या संस्थेला दान म्हणून देता येईल. १८६० चे संस्था नोंदणी अधिनियम कलम १३ व १४ प्रमाणे संस्था विसर्जनाची कार्यवाही पूर्ण करावी लागेल.

Banker's Social Association
Reg.No.
Solapur/
0000064/
2018

-: दा ख ला :-

प्रमाणित करण्यात येते की, **''बँकर्स सोशल असोसिएशन''** या संस्थेची नियम व नियमावलीची प्रत आहे.

| क्र. | नाव | पद | सही |
|---|---|---|---|
| १. | श्री. हारुण मलंग सय्यद | अध्यक्ष | |
| २. | श्री. सचिन विठ्ठलराव लाडे | सचिव | |
| ३. | श्री. रविंद्र श्रीकांत पिंगळे | खजिनदार | |

स्थळ : बार्शी

दिनांक : 03/02/2018

अध्यक्ष सचिव खजिनदार

Chairman Secretary Treasurer
Banker's Social Association



Scanned by CamScanner